





## प्रस्तावना

शिक्षणाचा मूळ पाया म्हणून 'कला' शिक्षणाकडे पाहिले जाते. 'कला' ही जीवनाच्या प्रत्येक अंगाला स्पर्श करणारी व पूर्णत्वाकडे नेणारी क्रिया आहे. त्यामुळे ती जीवनाशी इतकी निगडित आहे की, 'कलेसाठी जीवन की, जीवनासाठी कला' हे सांगणे कठीण झाले आहे.

कलेतून शिक्षण, कलेचे शिक्षण आणि कला हेच शिक्षण ही त्रिसूत्री जोपासत विविध प्रकारचे उपक्रम अभ्यासक्रमात दिलेले आहेत. त्यातून कलाशिक्षणासाठी पोषक व अनुकूल वातावरण तयार होण्याबरोबरच कलेची आवडही निर्माण होते. 'रस्किन' या तत्त्ववेत्त्याने म्हटले आहे, ''जेथे हात काम करतात, तेथे हस्तकला; जेथे बुद्धी काम करते, तेथे कौशल्य आणि जेथे हात व बुद्धी हृदयापासून काम करतात तेथे 'कलेची' निर्मिती होते.''

इयत्ता पहिली ते आठवीच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना करताना कला विषयाची व्याप्ती वाढवण्यात आली आहे. चित्र, शिल्प, गायन, वादन, नृत्य, नाट्य ह्या प्रमुख ललितकलांना स्पर्श करणाऱ्या घटकांचा यात प्रामुख्याने समावेश करण्यात आला आहे. पूर्वप्राथमिक व प्राथमिक स्तरांवर विद्यार्थ्यांना या कलांची किमान ओळख व्हावी, त्यांच्यातील कलात्मक गुण वाढीस लागून त्यांचे शालेय जीवन आनंदी व्हावे आणि पुढील जीवनातही या कलांचा आनंद घेता यावा असा उद्देश आहे.

कला विषयाचा पुनर्रचित अभ्यासक्रम विकसित करताना राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार-अधिनियम २००९ आणि राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१० मध्ये दिलेली मार्गदर्शक तत्त्वे, तसेच बदलत्या काळाच्या गरजा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे उद्दिष्ट दृष्टिपथात ठेवण्यात आले आहे. 'कृतिद्वारा शिक्षण' या संकल्पनेवर या विषयात भर देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना मुक्providविष्कार करता यावा या हेतूने सर्वसमावेशक व लवचीक होईल अशा प्रकारे कला अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात आली आहे.

ज्ञानरचनावादी दृष्टिकोनातून नवीन अभ्यासक्रमात, सहा कलाविषयांची नव्याने तीन गटांमध्ये विभागणी केली आहे. पहिल्या गटात 'चित्र-शिल्प' हे दोन कलाविषय पूर्वीप्रमाणेच आहेत. गायन-वादनाच्या अनेक संकल्पना नृत्यातील संकल्पनांशी समांतर आहेत म्हणूनच भरतमुनींना संगीताच्या व्याख्येत अपेक्षित असलेल्या गायन, वादन, नृत्य, ह्या तिन्ही कलांचा 'संगीत' या दुसऱ्या कलागटात समावेश केला आहे. अभिनयाबरोबरच नाटकासाठी गायन, वादन, नृत्य, चित्र-शिल्प इत्यादी कलाघटक पूरक असतात. अशा बहुस्पर्शी नाट्य विषयाचा, अभ्यासक्रमात तिसरा स्वतंत्र 'नाट्य' गट म्हणून विचार केला आहे.

अभ्यासक्रमात बदल करताना आवश्यक व अपरिहार्य असे काही नवीन उपघटक अंतर्भूत केले आहेत. असे असले तरी त्यामुळे अभ्यासाचा भार वाढणार नाही, उलट विषय समजण्यास मदतच होईल अशी काळजी घेण्यात आली आहे.

दैनंदिन व्यवहारातील गोष्टींतूनच विद्यार्थी अनेक विषय शिकतात. अदबशीरपणा, समूहाची शिस्त, राष्ट्रभक्ती, नीटनेटकेपणा ही मूल्येही अंगी बाणवतात. कलात्मक दृष्टीचा शिक्षक गणितासारखे विषयही रंजक करू शकतो.

अक्षर-आकड्यांची गीते, कथागीते यांसारखे अभ्यासक्रमातील नवीन घटक मनोरंजनाबरोबरच नकळत विद्यार्थ्यांचा अभ्यासही करवून घेतात. नृत्यातील 'रस' अनुभवताना भावनांचे प्रकटीकरण आणि इतरांच्या भावना विद्यार्थी समजून घेतात. अशा काही नवीन बाबींचा अभ्यासक्रमात विचार करण्यात आला आहे. कलाशिक्षणाद्वारे साध्य होणाऱ्या व्यक्तिमत्त्व विकासामधून सामाजिक जीवनात येणाऱ्या जबाबदाऱ्या आणि सांस्कृतिक मूल्यांची

जाण येते. तसेच सामूहिकतेने व सहकार्याने काम करण्याची तयारी या गुणांबरोबरच विद्यार्थ्यांची निरीक्षणशक्ती, स्मरणशक्ती आणि कल्पनाशक्ती वाढीस लागते. कामातील नीटनेटकेपणा, वागण्यातील शिस्त आणि यथोचित शिष्टाचाराचे महत्त्व समजणारा अभिरुचीसंपन्न व सौंदर्यदृष्टी असलेला कलारसिक विद्यार्थी निर्माण व्हावा असा प्रयत्न कलेच्या अभ्यासक्रमातून करण्यात आला आहे.

मुले जेव्हा एखाद्या गोष्टीचा आनंद घेतात, तेव्हा त्यांना त्याचे दडपण वाटत नाही. नेमकी हीच गोष्ट पुनर्रचित अभ्यासक्रमातील आनंददायी उपक्रमांतून साध्य केली आहे. उदा. मुलांना कार्टून्स आवडतात. खेळीमेळीच्या वातावरणात जेव्हा शिकणे व शिकवणे होते तेव्हा त्यातच अध्ययन, आकलन, सराव, मूल्यमापन हे सर्वच साधले जाते. एखादी गोष्ट विनोदी पद्धतीने किंवा रंजकपणे सांगितली गेली तर ती लगेच भावते आणि आत्मसात करता येते. त्यातूनच चित्रकलेत 'व्यंगचित्र' या घटकाचा अभ्यासक्रमात नव्याने समावेश करण्यात आला आहे. विनोदवृत्ती, आकलनशक्ती, बोधग्रहण, सहजाध्ययन इत्यादी सर्वच गोष्टींना या घटकाने एकावेळी हात घातला आहे. तसेच आजकाल मुलांचे अक्षर वाचण्याजोगे नाही अशी एक ओरड आहे. पुढच्या इयत्तांमध्ये ठराविक वेळेत प्रश्नपत्रिका लिहून काढणे हेच दिव्य वाटते, मग अक्षराकडे साहजिकच दुर्लक्ष होते. म्हणूनच जर अक्षराला मुळात वळणच चांगले असेल तर त्याकडे वेगळे लक्ष द्यावे लागत नाही. हाच धागा घेऊन सुलेखन व अक्षरलेखनाचा घटक नव्याने समाविष्ट झाला आहे. त्याचबरोबर पर्यावरणाशी स्नेह जोडताना टाकाऊ व निरुपयोगी वस्तूंपासून आकर्षक आणि नावीन्यपूर्ण कलाकृतींची निर्मिती करून विद्यार्थ्यांची कल्पकता व सौदर्यदृष्टी विकसित करणाऱ्या 'अन्य माध्यमाचे शिल्प' ह्या घटकानेही अभ्यासक्रमात स्थान मिळवले आहे.

पार्श्वसंगीतामधील एका वेगळ्याच क्षेत्राचा परिचय त्यांच्या आसपासच्या परिसरातील साधन साहित्याच्या वापरातून करून देण्यात आला आहे. वाळलेल्या शेंगा, रिकामे डबे, पट्टी यांतून आवाजनिर्मिती कशी होते याची जाणीव करून देत मजा आणली आहे. पार्श्वसंगीतात दृश्य माध्यमाला ध्वनिमाध्यमाची जोड दिली जाते. त्यामुळे हे एक वेगळेच क्षेत्र विद्यार्थ्यांना खुले झाले असून त्यामधून स्वनिर्मिती व नवनिर्मितीसाठी त्यांना प्रोत्साहित केले आहे. तसेच स्वतंत्र विचारांचा मागोवा घेण्यास उद्युक्त करताना मुक्ताविष्काराची संधी मिळते. यातूनच व्यावसायिक कौशल्ये प्राप्त करण्याकडे वाटचाल सुरू होते. त्यादृष्टीने ॲनिमेशन, प्रकाश-ध्वनी योजना अशा बाबींचा समावेश अभ्यासक्रमात प्राधान्याने केला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमधील अंगभूत कौशल्ये हेरून त्यांचे व्यावसायिक कौशल्यात रूपांतर करण्याची किमया 'कला' करते.

हसत-खेळत मुक्ताविष्कार करताना विविध सांस्कृतिक, सामाजिक मूल्ये, जीवन-कौशल्ये, सांस्कृतिक वारशाचे जतन व पर्यावरणविषयक जाणिवा कला अभ्यासक्रमातून प्रतीत होतात. तसेच समूहात गाताना, नाचताना लिंग, जात, धर्मभेद विसरून, भान हरपून मुले कृती करतात. अध्ययनविषयाशी असे तादात्म्य झाल्यावर आकलनही चटकन होते. त्यामुळे एखादा प्रवाहाबाहेरील विद्यार्थीदेखील स्वतःमध्ये न्यूनगंडाची भावना न ठेवता समूहाचा 'ताल-सूर' पकडून आत्मविश्वासाने उभा ठाकतो. अशा प्रकारे नित्य व दैनंदिन कलानुभव घेणाऱ्या विद्यार्थ्यांमधील कौशल्य व गुणांची नोंद सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाद्‌वारे घेता येते.

मुलांच्या भावविश्वात प्राणी-पक्षी, निसर्गातील अद्‌भूत घटना यांचे एक जादुई स्थान असते. संगीतातील गाणी, नृत्याभिनयाची गीते व नाट्य या विषयातील अभ्यासक्रमात आवर्जून घेतले आहेत. मुले त्यांची रेखाटने चित्रातून, व्यंगचित्रातून करतात आणि शिल्पातून ते साकारतात. 'अभिनय' हा मुलांमध्ये स्वभावतःच असतो. त्याला थोडे पैलू पाडावे लागतात. 'अभिनयगीते' हा घटक याच दृष्टीने 'नृत्य' गटात घातला आहे. मुले या आधीही कृती करून

गाणी गात, परंतु त्यांना विषयवैविध्य दाखवून योग्य दिशादर्शनाद्‌वारे अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य पुनर्रचित अभ्यासक्रमात दिले आहे. विद्यार्थी सुरूवातीपासूनच नृत्याला आवश्यक असणारा अभिनय शिकतात. त्याच्याच आवडीच्या गोष्टी, परंतु दिलेल्या विषयानुसार विद्यार्थी अभिनय करतात. इतकेच नव्हे तर अभिनय कसा करावा, कोणत्या चौकटीत बसणारा असावा याचे 'दिग्दर्शन' करण्यास तयार होतील यांची तरतूदही 'नाट्य' अभ्यासक्रमातून करण्यात आली आहे. अनेकदा, कलाविष्कारासाठी साधन-साहित्य उपलब्ध नाही किंवा खर्चीक व्यवस्था आहे अशी स्थिती येऊ शकते. मात्र अशा अडचणींमुळे विद्यार्थ्यांना ते अनुभव घेण्यापासून परावृत्त करणे हा उपाय योग्य नाही. या संदर्भात सखोल चर्चा आणि विचारमंथनातून 'शरीर' हे माध्यम म्हणून नेपथ्यासाठी वापरण्याचा अभिनव विचार समोर आला. विद्यार्थ्यांच्या शरीराकृतीतून पडदा, झाड, शिळा तयार करणे आणि चकचकीत कंपास पेटी, आरसा, ताटली यांचा कवडसा साधून 'प्रकाशयोजना' करणे या गोष्टींनी अभ्यासक्रमात नावीन्य आणले आहे.

देशातील बहुविध कलापरंपरा, स्थानिक कलापरंपरा, कलावंत यांचा जवळून परिचय व अभ्यास करण्याची संधी प्रस्तुत अभ्यासक्रमातून मिळते, तसेच नवनिर्मितीसाठी आनुषंगिक साधन-साहित्य हाताळण्याचे कौशल्य, नवनवीन तंत्रे व आधुनिक तंत्रज्ञान वापरण्यासाठी यांतून प्रोत्साहित केले आहे.

'नवरस' आणि जीवनाचा घनिष्ट संबंध आहे. मूल आपल्या साऱ्या भावना वेळोवेळी ज्या प्रकारे व्यक्त करते त्याचा परिचय 'रस' विचारातून होऊन, 'भावनिक संतुलन' या पुढच्या पायरीकडे त्याची वाटचाल सुरू होते. 'अद्‌भूतरसाचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना यामधून देता येईल, तसेच वर्गातील उपलब्ध जागा, साधन-साहित्य (बाक-टेबल) इ.चा योग्य तो वापर करून रंगमंच, विंग्ज या दृष्टीने विचार करण्यात आला. अभ्यासक्रमातील हे सारेच घटक नावीन्यपूर्ण आणि आकर्षकरीतीने आले आहेत. तसेच घटकांचे एक समान सूत्र घेऊन त्याची पायरीपायरीने पहिलीपासून आठवीपर्यंत काठिण्य पातळी वाढवत नेऊन पुढील अभ्यासक्रमाशी जोडले आहे.

आजच्या धकाधकीचे, स्पर्धात्मक युगाचे आणि ताणतणावाचे दिवस असलेल्या आयुष्यात, 'कला' विषय हा एक 'विसावा' आहे, 'विरंगुळा' किंबहुना जीवनाचे 'टॉनिक', आहे असे म्हणण्यास प्रत्यवाय नसावा. याही पुढे जाऊन 'कला' एक 'उपचार पद्‌धती म्हणूनही संशोधन झालेले आहे. विशेष गरजा असणाऱ्या मुलांना याचा विशेष फायदा करून देता येईल. कलेची उपासना करताना शरीरांतर्गत सिरोटॉनिनची निर्मिती वाढते. ती जीवनाच्या सुरळीतपणाला आवश्यक असते. 'समुपदेशन' म्हणूनही कलेचा उपयोग करावा असे आग्रही मत आहे. विविध आर्थिक, सामाजिक स्तरांतून आलेल्या विद्यार्थ्यांना एका समपातळीवर आणून असा उदात्त जीवनानुभव देणे 'कला'च जाणू शकते. अगदी ताणयुक्त मानसिक स्थितीतील व्यक्तीही एखादे चांगले संगीत ऐकून, कॉमेडी बघून वा चांगली कलाकृती अनुभवताना ताणमुक्त होऊ शकते.

अशा प्रकारे कलेद्‌वारे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडवताना, वरच्या पातळीवर जाऊन एक जबाबदार नागरिकही घडतो याची खात्री कला अभ्यासक्रमातून प्रतीत होते.

# विषय : कलाशिक्षण

## इयत्ता आठवी

### अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये

१) कलेतून शिक्षण, कलेचे शिक्षण आणि कला हेच शिक्षण ही त्रिसूत्री अभ्यासक्रमात जपली आहे.

२) विविध कलात्मक कौशल्ये आत्मसात करून त्यांचा उपयोग नवनिर्मितीसाठी केला आहे.

३) कलांच्या विविध उपक्रमांतून राष्ट्रीय एकात्मता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक समता इत्यादी मूल्यांचा परिपोष केला आहे.

४) कलाशिक्षणातून पर्यावरणविषयक जाणीव-जागृती निर्माण केली आहे.

५) देशातील बहुविध कला परंपरांची माहिती मिळणार आहे.

६) विविध प्रकारचे साधन-साहित्य व तंत्र वापरण्याचे कौशल्य आत्मसात होते. त्यामुळे व्यावसायिक दृष्टिकोन निर्माण होण्यास मदत होणार आहे.

७) कलाविषयक विविध उपक्रम आणि प्रकल्प निर्मितीस संधी दिल्यामुळे विद्यार्थ्यांना स्वनिर्मिती व नवनिर्मितीचा आनंद मिळणार आहे.

८) कलाविषयातून निरीक्षणशक्ती, स्मरणशक्ती आणि कल्पनाशक्ती इत्यादीं क्षमतांचा विकास होणार आहे.

९) कलाशिक्षणाद्वारे स्थानिक कलापरंपरा, सुप्रसिद्ध कलावंत यांचा जवळून परिचय व अभ्यास करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

१०) कला अभिव्यक्तीमुळे आवडीच्या क्षेत्रामध्ये विशेष ज्ञान संपादनाची संधी उपलब्ध करून दिली आहे.

११) कलाशिक्षणातून सौंदर्यदृष्टी, एकाग्रता आणि आत्मविश्वास वृद्धिंगत केला आहे.

१२) चित्र-शिल्प, संगीत (गायन-वादन-नृत्य) आणि नाट्य इत्यादी कलांच्या एकात्मिक प्रकटीकरणातून सर्वस्पर्शी अनुभव मिळणार आहे.

१३) कलेची जाण निर्माण करून तिच्या वाढीसाठी योग्य वातावरणनिर्मिती करून दिली आहे.

१४) कलाशिक्षणाद्वारे विश्वशांती साधण्याचा प्रयत्न केला आहे.

१५) विविध कलाविषयांतून इतर विषयांचे आनंददायी शिक्षण देण्यासाठी मुला-मुलींना समान संधी उपलब्ध करून दिली आहे.

१६) कलानुभवाचे जीवनातील महत्त्व लक्षात घेता अध्ययनानुरूप सर्व कलाप्रकारांतून 'स्व'च्या बौद्धिक, भावनिक, सामाजिक आणि एकात्मिक विकासाला हातभार लावला आहे.

१७) कलाशिक्षणाच्या विविध पैलूंचा उपयोग करून स्त्री-पुरुष समानता, समता, लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि लहान कुटुंबाचे महत्त्व यांसारख्या मूल्यांच्या संवर्धनाची संधी प्राप्त करून दिली आहे.

१८) कला अभिव्यक्तीच्या आत्मप्रकटीकरणातून सर्जनशीलता, भाव-भावना, संवेदनक्षमता आणि मानसिक आरोग्य सुदृढ करण्याचा प्रयत्न केला आहे.

## ३.१ विशिष्ट उद्‌दिष्टे

### अ) कलागट – चित्र–शिल्प

१) मनातील अव्यक्त कल्पना, भाव–भावना व्यक्त करण्याची संधी देणे.

२) निरीक्षणशक्ती, स्मरणशक्ती आणि कल्पनाशक्ती यांचा विकास करणे.

३) विविध माध्यमे, साहाय्यभूत कलासाधन–साहित्य आणि तंत्र यांचा कौशल्यपूर्ण वापर करून विद्यार्थ्यांच्या प्रयोगशील व शोधक वृत्तीला चालना देणे.

४) ऐतिहासिक वास्तू आणि पारंपरिक–सांस्कृतिक वारसा यांचे जतन करण्याबाबत जाणीव–जागृती निर्माण करणे.

५) स्थानिक कला, कलापरंपरा आणि कलावंत यांची माहिती/परिचयाची संधी उपलब्ध करून देणे.

६) कला निर्मितीतून पर्यावरणविषयक जाणीव जागृती करणे.

७) नैसर्गिक सौंदर्य स्थळे, ऐतिहासिक वास्तू/ठिकाणे व कलात्मक स्थळे यांचे निरीक्षण करण्याची संधी क्षेत्रभेटीद्‌वारे उपलब्ध करून देणे.

८) विद्‌यार्थ्यांमध्ये एकाग्रता निर्माण करणे व आत्मविश्वास वाढवणे.

९) विदयार्थ्यांमध्ये सौंदर्यदृष्टी निर्माण करणे.

१०) ‘स्व’–निर्मितीतून आनंद घेण्यास संधी उपलब्ध करून देणे.

११) स्वतंत्र विचार करण्याची संधी उपलब्ध करून देणे.

## ३.२ विशिष्ट उद्‌दिष्टे

### ब) कलागट – संगीत (गायन, वादन, नृत्य)

१) स्वतंत्र विचार करण्याची सवय लावणे.

२) प्रकटीकरण करण्यासाठी आत्मविश्वास वाढवणे.

३) स्वरांचा परिचय करून देणे.

४) संवादाशिवाय देहबोलीचा परिचय करून देणे.

५) ताल व राग संकल्पनेची तोंडओळख करून देणे.

६) गायन व नृत्याविष्कार यांच्या माध्यमांतून पाठ्यक्रमातील काव्यशिक्षण आनंददायी करणे.

७) समूहगीतातून सांघिक भावना वाढीस लावणे.

८) सामूहिक सादरीकरणातून ‘एकसूर’ व ‘एकताल’ साधणे.

९) आधुनिक साधनांचा उपयोग करून कलाशिक्षण आनंददायी व परिणामकारक करणे.

१०) सादरीकरणात स्थानिक व प्रादेशिक कलांचा अंतर्भाव करणे.

११) देशभक्तीपर गीतांमधून राष्ट्रभक्ती आणि निसर्गगीतांमधून पर्यावरण जागृती निर्माण करणे.

१२) गायन व वादनाच्या माध्यमांतून पाश्वसंगीताची निर्मिती करण्यास उद्युक्त करणे.

## ३.३ विशिष्ट उद्‌दिष्टे

### क) कलागट – नाट्य

१) नाट्यामधून सभाधीटपणा व आत्मविश्वास निर्माण करून व्यक्तिमत्त्व विकास साधणे.

२) स्पष्ट शब्दोच्चारावर भर देणे.

३) नाट्य आविष्कारातून सहभावना व सांघिकता जोपासणे.

४) परिसरातील विविध घटकांचे निरीक्षण व अनुकरण करून कल्पकतेने सादरीकरण करणे.

५) नेपथ्यामध्ये साहित्याऐवजी प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना कल्पक सहभागासाठी प्रवृत्त करणे.

६) देहबोलीचे सामर्थ्य वाढवून प्रभावीपणे सादरीकरण करण्याची संधी उपलब्ध करून देणे.

७) विविध कलांमधील संकल्पनांचा एकत्रितपणे आविष्कार करण्याची संधी उपलब्ध करून देणे.

८) नाट्य आविष्कारासाठी ध्वनी–प्रकाश योजना यांसारख्या तंत्रज्ञानाचा परिचय करून देणे.

९) सादरीकरणातील गुणग्राहकता व दाद देण्याची मनोवृत्ती तयार करणे.

१०) नाट्यशास्त्राचा इतिहास व स्थानिक कलावंतांचा परिचय करून घेण्याची संधी उपलब्ध करून देणे.

११) रंगमंच, दूरदर्शन, आकाशवाणी व आधुनिक तंत्राच्या साहाय्याने कला कार्यक्रमांचा आस्वाद घेण्याची आवड निर्माण करणे.

१२) पर्यावरणाविषयी जाणीव–जागृती निर्माण करणे.

१३) नाट्यातून राष्ट्रीय एकात्मता जोपासणे.

१४) नाट्यमाध्यमातून भूतदया जागृत करणे.

१५) रंगभूषा व वेशभूषेसाठी स्थानिक परिसरातील साहित्याचाच वापर करण्यास प्रवृत्त करणे.

## इयत्ता – आठवी विशिष्ट उद्दिष्टे

### अ) कलागट – चित्र–शिल्प

१) कलेच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे.

२) मनातील अव्यक्त कल्पना, भाव–भावना कला अभिव्यक्तीद्वारे साकार करणे.

३) विद्यार्थ्यांना कलेच्या विविध उपक्रमांतील घटकांची मांडणी करण्याची संधी व स्वातंत्र्य देणे.

४) रंग व रंगसंगती यांची प्राथमिक ओळख करून देणे व चित्रनिर्मितीत त्यांचा योग्य वापर करण्याचे स्वातंत्र्य देणे.

५) विविध कला, कलापरंपरा आणि कलात्मक स्थळे यांचा परिचय करून देणे व चित्र–शिल्प निर्मिती करण्यासाठी प्रेरणा देणे.

६) सांस्कृतिक व कलात्मक वारशाचे संवर्धन करण्याविषयी जाणीव–जागृती निर्माण करणे.

७) सामूहिक कृतिद्वारा जीवनकौशल्ये विकसित करणे.

८) कलानिर्मितीतून ‘स्व’ निर्मितीचा आनंद घेता येण्याची संधी देणे.

९) चित्र–शिल्प, संगीत, नाट्य इत्यादी कलांच्या एकात्मिक सादरीकरणासाठी प्रवृत्त करणे.

१०) विद्यार्थ्यांना कलानिर्मितीसाठी स्वतंत्र विचार करण्याची संधी उपलब्ध करून देणे.

### ब) कलागट – संगीत (गायन, वादन, नृत्य)

१) स्वतंत्र सादरीकरणाची क्षमता निर्माण करणे.

२) मनातील भाव–भावनांना प्रकटीकरणाची संधी देणे.

३) नवीन संकल्पनांचे सादरीकरण करण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे.

४) भारतीय शास्त्रीय संगीतातील शैलींची ओळख करून देणे.

५) राग परिचय करून देणे.

६) कलांचे एकत्रित सादरीकरण करण्यासाठी प्रवृत्त करणे.

७) समूहगीत, समूहनृत्य, समूहवादन यांच्या सादरीकरणातील कौशल्य वाढवणे.

८) आधुनिक माध्यमे व तंत्रे वापरून आस्वादकता वाढवणे.

### क) कलागट – नाट्य

१) नाट्याविष्कारातून सहभावना व सांघिकता जोपासण्यास प्रवृत्त करणे.

२) स्थानिक रंगमंचावरील, तसेच दृक्–श्राव्य माध्यमे व आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कला कार्यक्रमांचा आस्वाद घेण्याची आवड निर्माण करणे.

३) विविध आवाज आणि पार्श्वसंगीताशी संबंधित अभिनयाची संधी उपलब्ध करून देणे.

४) नाट्य, पथनाट्य यांमधून विविध समस्यांविषयी सामाजिक जाणिवा निर्माण करून व्यक्तिमत्त्व विकासाचा प्रयत्न करणे.

५) आधुनिक साधन-तंत्रांचा परिचय करून देणे व ती साधन-तंत्रे हाताळण्याची संधी उपलब्ध करून देणे.

६) छोटे-छोटे प्रसंग, कथा यांवर नाट्यलेखन करण्यास प्रवृत्त करणे.

७) नाट्यासाठी पूरक साहित्य कल्पकतेने तयार करण्यासाठी प्रवृत्त करणे.

८) स्वतंत्रपणे विचार करण्याची व आविष्कृत करण्याची संधी उपलब्ध करून देणे.

९) रंगभूषा, वेशभूषा, नेपथ्यमांडणी इत्यादी पूरक अंगांचा परिचय करून देऊन प्रत्यक्ष वापराची संधी उपलब्ध करून देणे.

१०) वाचिक, कायिक अभिनयाद्वारे व्यक्तिमत्त्व विकासाची संधी उपलब्ध करून देणे.

११) नाट्यशास्त्र, नाट्यइतिहास व स्थानिक कलावंत यांचा परिचय व माहिती मिळवण्यास प्रवृत्त करणे.

# पाठ्यक्रम

## विषय – कलाशिक्षण

**कलागट : चित्र–शिल्प** | **इयत्ता ८ वी**

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| **चित्र** | **रेखांकन** | • **रेषा –** वरील बाजूस वक्र रेषा, सूचिदर्शक (शिखराकृती) रेषा, गुंतावळ्याची रेषा.<br>• **आकार –** नैसर्गिक, अलंकारिक, भौमितिक, अमूर्त आकार, मानवनिर्मित वस्तूंचे आकार व मानवाकृती | पेन्सिल, रंगीत खडू, मॅजिक स्लेट, शाईचा पेन, जेलपेन, रंगीत पेन्सिल, चारकोल, स्टिक्स, स्केचपेन, वॅक्स क्रेयॉन्स, पेस्टल्स, परिसरातील उपलब्ध अन्य साहित्य इत्यादी | • वरील बाजूस वक्र रेषा, सूचिदर्शक रेषा, गुंतावळ्याची रेषा यांची ओळख करून घेतात व रेषा रेखाटनाचा सराव करतात.<br>• नैसर्गिक, अलंकारिक, भौमितिक, अमूर्त आकार, मानवनिर्मित वस्तूंचे आकार जाणून घेतात, आकार रेखाटनाचा सराव करतात.<br>• आकार रेखाटताना यांत्रिक साधनांचा उपयोग करतात.<br>• निसर्गातील विविध आकारांचे निरीक्षण करतात.<br>• विविध प्रकारचे आकार अचूकपणे ओळखतात.<br>• मानवाकृती रेखाटनाचा सराव करतात.<br>• सूचित आकारावर आधारित रेखाटन करतात.<br>• निरनिराळी माध्यमे हाताळून रेखाटनाचा अनुभव घेतात. |
| | **स्मरणचित्र** | • **घटना/प्रसंग/दृश्य इत्यादींवर आधारित–**<br>विविध खेळ, सामाजिक प्रसंग, सण/समारंभ/उत्सव/ राष्ट्रीय सण, दैनंदिन जीवनातील प्रसंग,<br>• पर्यावरण जाणीवजागृती,<br>• मूल्याधारित विषयावरील चित्रण इ. | पेन्सिल, रंगीत खडू, स्केचपेन, वॅक्स क्रेयॉन्स, पेस्टल्स, परिसरातील उपलब्ध अन्य साहित्य इ. | • निसर्गातील निरनिराळे घटक जसे–झाडे, घरे, प्राणी, पक्षी, ढग, मानव इत्यादींचे आकार व रंगांचे अवलोकन करतात.<br>• परिसरातील विविध खेळ, सामाजिक प्रसंग, दैनंदिन प्रसंग, घटना, दृश्य, सण, समारंभ, उत्सव इत्यादींचे निरीक्षण करतात.<br>• छोटे प्रसंग, पर्यावरण जाणीव जागृती, मूल्याधारित विषयांवरील रेखाटन करतात.<br>• आवडीचे रंग वापरून चित्रे रंगवतात.<br>• सामूहिक कृतिद्‌वारा विविध जीवन–कौशल्ये आत्मसात करतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **कल्पनाचित्र** | • गोष्टीतील काल्पनिक प्रसंग, लोककथा/पंचतंत्रातील कथा, पाठ्यपुस्तकातील कथा/कविता, वैज्ञानिक कथा–कल्पना माझे स्वप्न/कल्पनेतील चित्र इत्यादी. | पेन्सिल, शाईचा पेन, स्केचपेन, चारकोल स्टिक्स, वॅक्स क्रेयॉन्स, पेस्टल्स, पाठ्यपुस्तकातील कथा–कविता, वैज्ञानिक कथा, गोष्टींची पुस्तके, परिसरातील उपलब्ध अन्य साहित्य इत्यादी. | • परिचित कथा, साहसकथा, पौराणिक गोष्टीतील प्रसंग, पंचतंत्रातील कथा, पाठ्यपुस्तकातील काल्पनिक प्रसंग, कविता जाणून घेतात.<br>• स्वत:च्या कल्पना मुक्तपणे रेखाटतात.<br>• रेखाटनात कल्पकतेने रंगयोजना करतात.<br>• रेखाटन व रंगकामाच्या नीटनेटकेपणाचे महत्त्व जाणतात.<br>• रेखाटलेल्या चित्राबद्दल स्वत:चे विचार व्यक्त करतात. |
| | **संकल्पचित्र** | • विविध प्रकारच्या रेषा.<br>• नैसर्गिक, भौमितिक, अलंकारिक आकार, अमूर्त आकार.<br>• पुनरावृत्ती, उत्सर्जन, लय, तोलबदल, इ. तत्त्वाचा वापर.<br>• रंग व रंगसंगती<br>• कोलाज/मुद्रातंत्र व पोत इत्यादींचा सौंदर्यनिर्मितीसाठी उपयोग. | कागद, पेन्सिल, सोनेरी, रुपेरी कागद, अनुरेखन कागद, रंगीत पेन्सिली, स्केचपेन, कंपासपेटी–यांत्रिक साधने, जलरंग, ब्रश, वॅक्स क्रेयॉन्स, पेस्टल्स, विविध रंग व पोताचे कागद, खळ, डिंक, भेंडी, कांदा, बटाटा, तसेच ठसे घेता येतील अशा वस्तू, रंग, शाई किंवा परिसरातील उपलब्ध अन्य साहित्य इत्यादी. | • विविध प्रकारच्या, नैसर्गिक, भौमितिक, अलंकारिक आकारांची आवडीप्रमाणे रचना करतात.<br>• पुनरावृत्ती, उत्सर्जन, बदल, तोल इ. तत्त्व, आच्छादन पद्धती आणि समअंग/विषमअंग पद्धतीचा वापर करतात.<br>• विविध वस्तूंच्या बाह्यआकारात संकल्परचना करून स्वनिर्मितीचा आनंद घेतात.<br>• विविध रंग व रंगसंगतीची ओळख करून घेतात आणि चित्रात त्याचा वापर करतात.<br>• कोलाज, मुद्रातंत्र, पोत इत्यादींचा संकल्प चित्रात सौंदर्यनिर्मिती –साठी उपयोग करतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **स्थिरचित्र–निसर्गचित्र** | • दैनंदिन वापरातील परिचित मानवनिर्मित निसर्गनिर्मित वस्तूंच्या सुसंगत समूहाचे चित्रण. (४ ते ५ वस्तूंचा सुसंगत समूह.)<br>• पुरोभूमी व पार्श्वभूमीसह रेखाटन व रंगकाम.<br>• वस्तूंवरील छायाप्रकाश, पोत व रंगछटांसह चित्रनिर्मिती | कागद, पेन्सिल, रंगीत पेन्सिल, पेन, जेल पेन, दैनंदिन वापरातील वस्तू, माती–धातूची भांडी, फळे, फळभाज्या, पेन्सिल, रंगीत खडू, स्केचपेन, वॅक्स क्रेयॉन्स, पेस्टल्स, जलरंग, ब्रश, रंगीत कापड (ड्रेपरी) | • मानवनिर्मित वस्तू, निसर्गनिर्मित घटक यांचे निरीक्षण करतात.<br>• वस्तू, फळे, फळभाज्या, पाने, फुले, डहाळ्या यांचे आकार व लहानमोठेपणा यांतील फरक समजून घेतात.<br>• सुसंगत वस्तूसमूहाचे रेखाटन करतात.<br>• पार्श्वभूमी, पुरोभूमी वस्तूसमूह यांचे निरीक्षण करतात व वर्गीकरण करतात.<br>• वस्तूंवरील रंगछटा, छायाप्रकाश, पोत यांचा अभ्यास करतात.<br>• आवडीच्या रंगाचे वस्तूंचे रंगकाम करतात. |
| | **अक्षरलेखन** | • फलकावर शैलीदार अक्षर लेखन<br>• नामफलक लेखन<br>• नामातील भावानुसार लेखन<br>• उत्तम शीर्षकांचा संग्रह | पेन्सिल, पेन, स्केचपेन, शाईचा पेन, जेल पेन, रंगीत खडू, शाई, रंग, बोरू, मार्कर पेन, अंक–अक्षरांच्या स्टेन्सिल्स, संगणकसंच, विविध रंग व जाडीचे कागद, खळ, दोरा. | • प्रसंगानुसार फलकावर अक्षरलेखन करून सजावट करतात.<br>• शब्दांच्या भावानुसार अक्षरे रेखाटतात.<br>• अक्षरांच्या स्टेन्सिल्स बनवतात, त्याआधारे गिरवतात.<br>• अक्षरलेखनासाठी संगणकाचा उपयोग जाणून घेतात.<br>• जाड कागदांचे अंक, अक्षरे कापून प्रसंगानुरूप त्याचे संयोजन करतात. |
| | **व्यंगचित्र** | • वेगवेगळ्या व्यक्तिमत्वाच्या व्यंगचित्रांचा संग्रह<br>• स्वत:ला आवडणाऱ्या विषयावर व्यंगचित्राचे रेखाटन<br>• ॲनिमेशन तंत्राचा परिचय | पेन्सिल, पेन, स्केचपेन, जेल पेन, रंगीत खडू, शाई, रंग, मार्कर पेन, वर्तमानपत्रे, मासिकातील व्यंगचित्रांचे नमुने, खळ इत्यादी. दृकश्राव्य माध्यमे | • व्यंगचित्रांचे निरीक्षण करतात.<br>• व्यंगचित्रांचा संग्रह करतात.<br>• प्रसंगानुरूप आवडणाऱ्या विषयावर व्यंगचित्रे काढतात.<br>• व्यंगचित्रांच्या कात्रणातून सलग चित्रकथा तयार करतात.<br>• ॲनिमेशनसारख्या तंत्रांची माहिती मिळवतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **कलाइतिहास** | • **राज्याची कलापरंपरा –** प्राचीन संस्कृती अवशेष, आदिम कला, लोककला, समकालीन कला, महाराष्ट्रातील कलासंग्रहालये, कलादालने, कलाशिक्षण संस्था इत्यादी. | चित्रे, छायाचित्रे, उपलब्ध माहितीपुस्तिका, संदर्भ पुस्तके, चित्रपट्टी, स्लाईड्स, सीडीज, पारदर्शिका, प्रतिकृती इत्यादी. | • प्राचीन संस्कृती अवशेष, आदिम कला, लोककला, समकालीन कला इत्यादींची माहिती मिळवतात.<br>• कला संग्रहालये, कलादालने, कलाशिक्षण संस्था इत्यादींच्या क्षेत्रभेटी, माहितीद्वारे विविध प्रकारची माहिती घेतात.<br>• प्राचीन कला व स्वनिर्मित रेखाटनाची सांगड घालतात.<br>• कलाशिक्षण संस्थांची माहिती मिळवतात. |
| **शिल्प** | **मातीशिल्प** | • विविध घनाकृती आकार<br>• विविध प्रकारच्या सोप्या वस्तू मुखवटे, मानवाकृती इत्यादी. कुंभारकाम, मातीकाम करणाऱ्यांची माहिती.<br>• लादीवरील उठावशिल्प, अधिक–उणे पद्धतीचा वापर.<br>• साचा तयार करणे.<br>• शिल्पकृतीचे रंगकाम. | परिसरातील उपलब्ध योग्य माती, रंगीत माती (प्ले–क्ले), कुंभार माती, शाडू माती, मातकामाची साधने, (टूल्स) रंग–ब्रश इत्यादी. | • मातकामासाठी योग्य माती तयार करतात.<br>• मातकामाचे कौशल्य आत्मसात करतात.<br>• विविध घनाकृती आकारांतील फरक ओळखून घनाकृती तयार करतात.<br>• अधिक–उणे पद्धतीचा वापर करून शिल्पनिर्मिती करतात व रंगकाम करतात.<br>• मातीचा साचा तयार करण्याची पद्धती समजून घेतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन-साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **कागदशिल्प** | • कागदी लगद्याचे मुखवटे.<br>• लगद्यापासून वस्तू निर्मिती.<br>• कागद व इतर आधारभूत साहित्य घेऊन कलाकृती निर्मिती. | घोटीव कागद, सोनेरी-रुपेरी कागद, पतंगी कागद, जुनी मासिके, वृत्तपत्रे, पत्रिकांचे कागद, खाकी कागद, क्रेप पेपर यांसारखे अन्य जाड-पातळ कागद, डिंक-खळ, कात्री, कटर स्केल व उपलब्ध इतर साहित्य, रंगसाहित्य, कागदी लगदा इत्यादी. | • कागदी लगदा हाताळण्याची पद्धत जाणून घेतात.<br>• कागद व इतर आधारभूत साहित्य घेऊन आवडीची त्रिमित कलाकृती तयार करतात.<br>• लगद्यापासून प्राणी, पक्षी, मानवी चेहरे इत्यादींचे मुखवटे, वस्तू तयार करतात.<br>• मुखवटे आवडीच्या रंगांनी रंगवतात.<br>• सामूहिक कृतिद्वारा विविध जीवनकौशल्ये आत्मसात करतात. |
| | **अन्य माध्यमाचे शिल्प** | • त्रिमित वस्तू निर्मिती.<br>• त्रिमित वस्तूंची सजावट.<br>• निकामी/निरुपयोगी वस्तूंच्या उपयोगांतून कलात्मक वस्तू निर्मिती | रिकामी कागदी खोकी, खेळणी, पणती, गाडगे, (बोळके), बिया, धान्य, टरफले, शंख, शिंपले, मणी, लेस, दोरा, टिकल्या, खळ, डिंक इत्यादी. | • निरुपयोगी/निकामी वस्तूंचा संग्रह करतात.<br>• परिसरातील सहज उपलब्ध होतील अशा निरुपयोगी वस्तूंचा शिल्पसजावटीसाठी उपयोग करतात.<br>• निरुपयोगी वस्तूपासून कलात्मक/उपयुक्त वस्तू बनवण्याचे कौशल्य आत्मसात करतात. |

## विषय – कलाशिक्षण

**कलागट : संगीत (गायन–वादन)** **इयत्ता ८ वी**

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| **गायन** | **समूहगीत** | • सामाजिक जाणिवांचे महत्त्व सांगणारी गीते (पर्यावरण, लोकसंख्या, अंधश्रद्धा निर्मूलन)<br>• विविध धर्मांतील प्रार्थना. | हार्मोनियम, उपलब्ध ताल–वाद्ये, गीतसंग्रह, उपलब्ध माध्यमे (ध्वनिमुद्रण) | • गीतातील आशय समजून गातात.<br>• सामाजिक जाणिवा वाढीस लागतात.<br>• अशाप्रकारच्या गीतांतून सामाजिक प्रश्नांविषयीचे ज्ञान मिळवतात.<br>• एकसंघतेने सामूहिक सादरीकरण करतात.<br>• आत्मविश्वासातून सफाई, सहजता व धीटपणा येतो.<br>• समूहगीतातून विविध प्रकारच्या भावना व भाव व्यक्त करतात.<br>• विविध धर्मांतील प्रार्थनेचे महत्त्व जाणून घेतात व राष्ट्रीय एकतेची भावना जोपासतात. |
| | **स्वरालंकार** | • 'मालकंस' रागातील स्वरालंकार | हार्मोनियम, तयार केलेली सी.डी. | • रागातील सोप्या अलंकारातून रागस्वरूप समजून घेतात.<br>• रागनियमाप्रमाणे स्वरांचे चढ–उतार समजून घेऊन त्या प्रमाणे गातात. कोमल स्वरांविषयी संकल्पना समजून घेतात. |
| | **शास्त्रीय संगीत** | • मागील दोन रागांच्या बंदिशी<br>• एका शास्त्रीय गायकाचा परिचय | ध्वनिमुद्रण (उपलब्ध माध्यमे) हार्मोनियम, तयार केलेली सी.डी., गायकाचे छायाचित्र, माहिती, कात्रणे, कृतिपुस्तिका | • 'बंदीश' या शास्त्रीय गीत प्रकाराची माहिती घेतात.<br>• 'बंदीशीतून रागस्वरूप समजून घेतात.<br>• उपलब्ध माध्यमांतून बंदिशीच्या सादरीकरणाचा अनुभव घेतात.<br>• माहितीद्वारे शास्त्रीय गायकाचा परिचय करून घेतात.<br>• गायकाचे त्या क्षेत्रातील कार्य, योगदान इ. ची माहिती घेतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| वादन | **वादन परिचय** | • एका वादक कलाकाराचा परिचय<br>• 'त्रितालाचा' परिचय<br>• आधुनिक वाद्य परिचय (गिटार, सिंथेसायझर इ.) | कलाकाराचे छायाचित्र, माहिती, कात्रणे, तबला, आधुनिक वाद्यांची चित्रे, उपलब्ध प्रतिकृती, तयार केलेली सी.डी. | • वादक कलाकाराचा परिचय करून घेतात.<br>• त्याच्या वादनशैलीची माहिती व त्याचे त्या क्षेत्रातील योगदान समजून घेतात.<br>• 'त्रिताल' या तालाची माहिती (मात्र, काल, खंड इ.) करून घेतात व हातावर देण्याचा ठेका समजून घेतात.<br>• आधुनिक वाद्यांविषयीची माहिती घेतात.<br>• दृक-श्राव्य माध्यमांद्वारे ताल, वाद्ये इ. चे सामान्य ज्ञान मिळवतात. |
| | **पार्श्वसंगीत** | • स्वतंत्र वाद्यवृंद तयार करणे | हार्मोनियम, तबला, इतर उपलब्ध सूरताल वाद्ये, उपलब्ध वस्तू, शब्दसंदेश पूर्वध्वनिमुद्रित पार्श्वसंगीत. | • स्वररचना करताना रसनिर्मितीचा आनंद घेतात.<br>• स्वररचनेला पूरक तालवाद्यांची बांधणी करू लागतात.<br>• संगीताशी समरस होऊन एकत्रित, एकात्मिक पद्धतीने सादरीकरण करतात.<br>• पार्श्वसंगीत निर्मितीसाठी कल्पकतेचा वापर करतात.<br>• ध्वनिमुद्रित पार्श्वसंगीत लक्षपूर्वक श्रवण करतात. |

# विषय – कलाशिक्षण

**कलागट : संगीत (नृत्य)** **इयत्ता ८ वी**

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| नृत्य | हालचाली | • **नृत्यसंरचना –**<br>पर्यावरण गीत सादरीकरण/संकलन | सी.डी. उपलब्ध तालवाद्य, उपलब्ध दृक्–श्राव्य माध्यमे | • हस्तमुद्रा, रस, दृष्टिभेद यांचा समन्वय प्रस्तुत संरचनेतून साधतात.<br>• पर्यावरणपूरक निसर्गगीतांच्या कवितांचा संग्रह करतात.<br>• आकर्षक हालचालींतून पर्यावरणाविषयी परिणामकारक जाणीव जागृती करतात.<br>• नृत्यांतून, निसर्गातील घटना व दृश्यांचे कल्पकतेने सादरीकरण करतात. |
| | नृत्य परिचय | • **शास्त्रीय नृत्यशैली परिचय –**<br>मोहिनी अट्टम, कथकली (चित्रसंग्रह, चर्चा) | चित्र, हस्तपुस्तिका, उपलब्ध दृक्–श्राव्य माध्यमे | • प्रस्तुत शास्त्रीय नृत्यशैलींचा परिचय करून घेतात.<br>• प्रांत, वेशभूषा, वाद्य यांची माहिती जाणून घेतात.<br>• विविध शास्त्रीय नृत्यशैलींतील फरक समजून घेतात.<br>• भारतीय नृत्यशैलींचे महत्त्व जाणून घेतात.<br>• शिल्प व चित्रांतील नृत्यकृतीविषयी माहिती घेऊन स्वत:चे मत व्यक्त करतात.<br>• त्यांमधील सौंदर्यविषयक बाबींवर चर्चा करतात.<br>• नृत्यशैलींची माहिती, कात्रणे, चित्रे यांचा संग्रह करतात. |
| | रस परिचय | • **रसांचा परिचय –**<br>अद्भुत<br>बीभत्स<br>शांत | पाठ्यपुस्तकातील चित्रे, वृत्तपत्रे मासिकांतील चित्रे, दूरचित्रवाणीवरील मालिका | • प्रस्तुत रसांमधील फरक समजून घेतात.<br>• सादरीकरणात रसांचे महत्त्व जाणून घेतात.<br>• दृष्टिभेद, हस्तमुद्रा आणि रस यांचा सहसंबंध जोडतात.<br>• पाठ्यपुस्तके, गोष्टींची पुस्तके, लेखनसाहित्य, चित्रे यांतील आशय समजून रसांची ओळख सांगतात.<br>• या तीन रसांसह सर्व नऊ रसांचे कृतींतून प्रकटीकरण करतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन-साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **अभिनय गीत** | • संगीत, नाट्य आणि चित्र-शिल्प यांचे एकात्मिक सादरीकरण<br>• कथानकांवर आधारित | गोष्टींची पुस्तके, उपलब्ध वाद्य, दृक्-श्राव्य माध्यमे | • विविध कथांचा संग्रह करतात व वाचन करतात.<br>• अभिनय सादरीकरणात रस, दृष्टिभेद, हस्तमुद्रा यांचा योग्य उपयोग करतात.<br>• उद्बोधक कथानकांद्वारे संगीत, नाट्य, चित्र-शिल्प व नृत्य इत्यादी कलांच्या एकत्रित सादरीकरणातून सामाजिक संदेशही देतात. |

## विषय – कलाशिक्षण

**कलागट : नाट्य** **इयत्ता ८ वी**

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| **नाट्य** | **पायाभूत हालचाली** | • विविध प्रसंग, गोष्टी, कथा इत्यादींचे, गटाने संवादविरहित सादरीकरण.<br>• समन्वय साधणाऱ्या समूहाच्या हालचाली उदा. रेल्वे प्रवासी, परेड इ. | पाठ्यपुस्तके, गोष्टींची पुस्तके | • पाठ्यपुस्तकातील प्रसंग, गोष्टी, कथा यांचे गटाने संवाद–विरहित सादरीकरण करतात.<br>• देहबोलीचे सामर्थ्य, प्रभावी अभिनयासाठी जाणून घेतात.<br>• सहभावना व सांघिकता जोपासतात.<br>• शारीरिक हालचालीतून गटागटांनी छोट्या कृती करतात. |
| | **वाचिक अभिनय/ अनुभव कथन** | • पाठ्यपुस्तकातील पाठांचे साभिनय वाचन. नाटक, चित्रपट, दूरचित्रवाणी, देशभक्तीपर कार्यक्रम | पाठ्यपुस्तके उपलब्ध साधन – साहित्य दूरदर्शन, सी.डी./डी.व्ही.डी. प्लेअर इत्यादी. | • पाठ्यपुस्तकातील पाठांचे भावानुरूप साभिनय वाचन करतात.<br>• नाटक, दूरदर्शन, चित्रपट व इतर सांस्कृतिक कार्यक्रम पाहून त्यांमधील वाचिक अभिनय, संवादफेक याविषयी चर्चा करतात.<br>• चांगल्या कार्यक्रमाचे रसग्रहण करतात.<br>• उत्कृष्ट कार्यक्रमाचे निरीक्षण करून नक्कल करण्याचा प्रयत्न करतात. |
| | **सादरीकरण/ एकात्मिक सादरीकरण** | • सामाजिक समस्यांवर नाट्यलेखन.<br>• पाठ्यपुस्तकातील कवितांचे सादरीकरण. नाट्य–गायन–वादन, चित्र– शिल्प एकात्मिक सादरीकरण<br>• बाहुलीनाट्य व छायानाट्य एकात्मिक सादरीकरण. | उपलब्ध साधन साहित्य पाठ्यपुस्तक<br>एकात्मिक सादरीकरणास उपयुक्त साहित्य.<br>बाहुलीनाट्य व छाया–नाट्यास उपयुक्त साहित्य | • सामाजिक समस्या जाणून घेऊन त्यावर आधारित प्रसंगांच्या नाट्यलेखनाचा प्रयत्न करतात.<br>• सामाजिक समस्येवर चर्चा करतात.<br>लिहिलेल्या प्रसंगाचे नाट्यीकरण करून सादरीकरण करतात.<br>• चित्र–शिल्प, नृत्य, गायन–वादन या कलांचा उपयोग करून नाट्याचे सादरीकरण करतात.<br>• बाहुलीनाट्य व छायानाट्य यांचे एकात्मिक सादरीकरण करतात.<br>• सादरीकरणातील योग्य प्रसंगी दाद देतात व कौतुक करतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन-साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **दिग्दर्शन** | • आशयाची समज, गटाचे नेतृत्व, गटकार्य<br>• पाठ्यपुस्तकातील संवादरूपी धड्याचे सादरीकरण | पाठ्यपुस्तके | • योग्य पात्रांची निवड करतात.<br>• आशयानुरूप अभिनयाचे मार्गदर्शन करतात.<br>• अभिनय व पूरक साधनांचा ताळ-मेळ घालतात.<br>• आशयानुरूप संवाद-उच्चारणाचे मार्गदर्शन करतात. |
| | **क्लासरूम थिएटर (वर्गनाट्यगृह)** | • रंगमंचाचा नकाशा | उपलब्ध साधन-साहित्य, फळा, रंगमंच, प्रेक्षागृह, बाजूचे भाग (विंग्ज्) उपलब्ध साहित्य | • रंगमंचाचा नकाशा जाणून घेतात.<br>• रंगमंचाची, नकाशाच्या आधारे व उपलब्ध साहित्यद्वारे मांडणी करतात.<br>• सादरीकरण करण्यास वर्गनाट्यगृह सुसज्ज करतात. |
| | **नेपथ्य व तांत्रिक अंगे** | • रंगमंच प्रतिकृती, रंगभूषा, वेशभूषा, ध्वनिमुद्रण, प्रकाशयोजना-कंपासपेटी, डबा, आरसा वापरून | उपलब्ध साधन साहित्य रंगभूषा, वेशभूषा प्रकाशयोजना, ध्वनिक्षेपण, ध्वनिमुद्रण यासाठी आवश्यक साधन साहित्य आरसा, चकचकीत कंपासपेटी, ताटली | • उपलब्ध साधन साहित्यापासून रंगमंचाची प्रतिकृती तयार करतात.<br>• तयार प्रतिकृतीचे निरीक्षण करून चर्चा करतात.<br>• रंगभूषेचा अभ्यास करून भूमिकेप्रमाणे एकमेकांची रंगभूषा/वेशभूषा करतात.<br>• सादरीकरणातील विषयानुसार देखावा तयार करतात.<br>• ध्वनिक्षेपक, ध्वनिमुद्रक व उपलब्ध प्रकाशयोजनेचा कल्पकतेने वापर करतात. |
| | **नाट्यइतिहास** | • भरतमुनींचे नाट्यशास्त्र व मराठी रंगभूमी<br>• स्थानिक परिसरातील, नाट्यपरंपरांची माहिती उदा. दशावतार, वग | उपलब्ध पुस्तके, परिसरातील नाट्य तज्ज्ञ | • भरतमुनी व नाट्यशास्त्र यांची प्राथमिक माहिती संकलनाचा प्रयत्न करतात.<br>• मराठी रंगभूमीची उपलब्ध पुस्तके व परिसरातील नाट्य तज्ज्ञांकडून माहिती संकलित करतात.<br>• स्थानिक व परिसरातील नाट्य परंपरांची माहिती घेतात. |